# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. २४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : eb@mpcb.gov.in

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

कल्पतरु पॉईंट, ४ मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२


जा.क्र. मप्रनि/२५०८२३-FTS-0032 दिनांक: २३/०९/२०२५

**परिपत्रक**

विषय: मंडळाच्या बाहेरील मंत्रालयीन कार्यालयीन कामकाजांसाठी ई-ऑफीस प्रणालीच्या अंमलबजावणीसंबंधी.

संदर्भ: शासन परिपत्रक क्र.: मतांसं-२०१२/प्र.क्र.२५३/का.३९, दिनांक ०९ नोव्हेंबर २०२०

शासनाच्या धोरणानुसार शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक व प्रभावी वापर करून शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसूत्रता यावी, दस्तऐवज व माहिती सुरक्षित राहावी, तसेच निर्णय प्रक्रिया गतिमान व सुलभ होऊन कार्यालयीन कामकाज सुरळीत व्हावे यासाठी मंडळामध्ये महाराष्ट्र शासनाची ई-ऑफीस प्रणाली प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत शासकीय व निमशासकीय कार्यालये यांनी ई-ऑफिस च्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यास भर देण्यात आला आहे. तरी वरील बाब लक्षात घेता मंडळाच्या मुख्यालयातील विभागप्रमुख, सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक अधिकारी यांच्या करिता ई-ऑफिस प्रणाली वापरासाठी आयडी मंडळाच्या ई.आय.सी. विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या माहीती तंत्रज्ञान विभागाशी समंगत साधून तयार करण्यात आलेले आहेत.

मंडळामधील अंतर्गत टपाल आणि नस्त्यांसाठी IMIS प्रणालीमध्ये असलेल्या FTS मॉड्युलचा वापर करावा, परंतु मंडळाचे मुख्यालय व इतर क्षेत्रीय कार्यालये बाहेरील टपाल व नस्त्यांचे देवाणघेवाण करिता म्हणजेच फक्त इतर शासकीय कार्यालयांमध्ये टपाल व नस्त्यांचे देवाणघेवाण करिता ई-ऑफिस प्रणालीचा वापर करावा. मंडळाबाहेरील इतर शासकीय कार्यालयांना ई-ऑफिस मार्फतच पत्र व्यवहार करावा. मंडळातील सर्व कार्यालयांनी ई-ऑफिस प्रणालीचा १००% वापर होईल याची दक्षता घ्यावी.

ई-ऑफिस ची अंमलबजावणी तत्काळ करवायची असल्याने याचा वापर करण्याकरिताच्या कार्यपद्धती जाणून घेण्याकरिता मंडळाच्या ई.आय.सी. विभागामार्फत प्रशिक्षण घेण्यात येणार असून, याकरिता प्रत्येक विभागानी आपल्या विभागातील ई-ऑफिस प्रणालीच्या प्रशिक्षणासाठी एक नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करून त्याचा तपशील जसे अधिकारी/कर्मचारी यांचे नाव, पदनाम, ई-मेल आयडी तसेच संपर्क क्र. इत्यादि ई.आय.सी. विभागाला तात्काळ कळवावे जेणेकरून ई-ऑफिस चा वापर म. प्र. नि. मंडळाच्या मुख्यालय, प्रादेशिक व उप-प्रादेशिक कार्यालयांमध्ये करण्यास सोईस्कर होईल.

सदर ई-ऑफिस प्रणाली वापराबाबत सहाय्यतेसाठी ई.आय.सी विभागा अंतर्गत असलेल्या आयटी हेल्पडेस्कशी संपर्क साधावा.

सदर परिपत्रक दिनांक २४/०९/२०२५ पासून अंमलात येत असून या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. अविनाश ढाकणे, भा.प्र.से.)

सदस्य सचिव

प्रती:

1. हवा प्रदूषण निवारण अभियंता/जल प्रदूषण निवारण अभियंता/ सहायक सचिव (तांत्रिक) /प्रधान वैज्ञानिक अधिकारी/ मुख्य लेखा अधिकारी/कार्यकारी अभियंता/ विधी अधिकारी-१/२/ सहायक सचिव (आस्थापना)/ प्रशासकीय अधिकारी/ कार्यकारी अभियंता /प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय)/ प्रादेशिक अधिकारी-जैव-वैद्यकीय कचरा/ सांख्यिकी अधिकारी.
2. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, मध्यवर्ती प्रयोगशाळा, महापे/नवी मुंबई/पुणे
3. प्रादेशिक अधिकारी - मुंबई/ठाणे/ कल्याण/ रायगड/ नवीमुंबई/ पुणे/ नशिक/ नागपूर/ छत्रपती संभाजीनगर/ कोल्हापूर/ अमरावती/ चंद्रपूर
4. मा अध्यक्ष म प्र नि मंडळ यांचे स्वीय सहायक.